ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख ९ जुलै, १९५२ अंक १८

## विविध माहिती

**कलकत्त्यांत छोट्या टॅक्सीज**—कलकत्ता शहरांत लवकरच १० ते १९ अश्वशक्तीच्या ४८ छोट्या टॅक्सीज धावूं लागतील शहरांत ह्यापेक्षां मोठ्या भाड्याच्या मोटारींची संख्या १,१५२ आहे. पोलिसांकडे छोट्या गाड्या चालविण्याच्या परवानगीसाठी ४ हजार अर्ज आले आहेत. दर, मैलाला ८ आणे आहे.

**सुरतमधील कारखाने**—सुरत शहरांतील ५० लहान कारखान्यांना १९४८ चा फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. मुद्दाम मोठे असलेले कारखाने ह्या कायद्याच्या कक्षेंतून सोडविण्यासाठी मालकांनीं त्यांचेच छोटे कारखाने केले असें सरकारचें म्हणणें आहे. ह्या लहान कारखान्यांतून १० पेक्षां कमी कामगार कामावर आहेत.

**लोखंडाच्या कारखान्यासाठी जपानची मदत**—जपानमधील प्रसिद्ध कोबे स्टील वर्क्स आणि टाटा आयर्न अँड स्टील कंपनी ह्यांच्या दरम्यान १,००० टन लोखंड गाळणारी एक भट्टी उभारण्याच्या वाटाघाटी चालूं आहेत. जपानी कंपनी ७० कोटी येनचें साहित्य देणार असून भट्टींतून तयार झालेलें बिडाचें लोखंड जपानला निर्यात होणार असल्याचें समजतें.

**साखरेच्या निर्यातीची परवानगी**—३० जून १९५२ पर्यंत ५०,००० टन साखर निर्यात करूं दिली जाईल असें भारतीय सरकारनें गेल्या एप्रिलमध्यें जाहीर केलें होतें. आतां ही मुदत ३१ ऑक्टोबर १९५२ पर्यंत वाढविण्यांत आली आहे. साखरेच्या निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी सरकारनें एक कमिटीहि स्थापन केली आहे.

**पोलंड-पाकिस्तान करार**—पाकिस्तान आणि पोलंड ह्यांनीं १८ महिने मुदतीच्या एका व्यापारी करारावर नुकत्याच सह्या केल्या. पोलंड पाकिस्तानला कोळसा, कापड, सिमेंट व साखर पाठविणार असून पाकिस्तानकडून ताग, कापूस, कातडीं, लोंकर आणि खेळाचें सामान घेणार आहे.

**अमेरिकेला स्वदेशीच्या व्रताचें वावडें?**—कच्च्या मालाविषयीं अहवाल करण्यासाठी अमेरिकन सरकारनें नेमलेल्या कमिटीनें आपला अहवाल सादर केला आहे. कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, बाय अमेरिकन ॲक्ट रद्द करण्यांत यावा. ह्या कायद्याप्रमाणें जो माल भरपूर प्रमाणांत व योग्य किंमतींत अमेरिकेंत मिळत असेल तो परदेशीं घेण्यांत येऊं नये असें बंधन सरकारी खरेदीवर घालण्यांत आलें आहे. हा कायदा १९३३ सालीं करण्यांत आला आहे.

**कर्नाटक विद्यापीठाला देणगी?**—म्हैसूरच्या राजप्रमुखांनीं कर्नाटक विद्यापीठाला ५ लाख रुपयांची देणगी देण्याचें कबूल केलें आहे असें समजतें. त्यांच्या नांवानें विद्यापीठ पदवीदान समारंभासाठीं दिवाणखाना बांधणार आहे. बेळगांव लॉ सोसायटीलाहि राजप्रमुख देणगी देणार असल्याची वार्ता आहे.

**एलिझाबेथ राणीचा राज्यारोहण-समारंभ**—१९३७ सालीं सहावे जॉर्ज ह्यांना राज्याभिषेक झाला त्यावेळीं ब्रिटिश सरकारनें ३,०३,००० पौंड खर्च केले होते. चित्रविचित्र रंगांच्या निशाणांना त्यावेळीं एका वाराला २ शिलिंग पडत असत. आतां एका वारामागें ८ शिलिंग, ८ पेन्स पडत आहेत. ब्रिटनच्या निशाणाला त्यावेळीं १७ शि., ६ पेन्स पडत. आतां ३ पौंड, ५ शिलिंग पडतात.

**म्हैसूरचा लंडनमधील व्यापारी प्रतिनिधी**—म्हैसूर राज्याच्या लंडनमधील व्यापारी प्रतिनिधीला परत बोलावण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे असें समजतें. ह्या प्रतिनिधींचें काम भारताच्या लंडनमधील हायकमिशनरकडे सोपविण्यांत येणार आहे. म्हैसूर सरकार ह्या जागेसाठी दरवर्षी १२,४२६ पौंड खर्च करीत असे.

**मुसलमान मुख्य मंत्र्यांची परिषद**—पाकिस्तान-सरकार मुसलमान राष्ट्रांच्या मुख्य मंत्र्यांची एक परिषद भरविण्याच्या खटपटींत आहे. ही परिषद प्रथम गेल्या एप्रिलमध्यें भरविण्यांत येणार होती. तेव्हां ती तहकूब करण्यांत आली. नंतर रमझानच्या सणानंतर ती भरणार होती. पण आतां ती पुन्हा तहकूब करण्यांत आली आहे.

**अमेरिकेंत माकडांना मागणी**—संशोधनांत उपयोग करण्यासाठीं म्हणून सध्या अमेरिकेंत माकडांना फार मागणी आहे. मलायांतून एका विमानानें ६०० माकडें आणि बऱ्याच प्रकारचे पक्षीहि नुकतेंच अमेरिकेंत नेले. भारतांत माकडे पिकांचा नाश करतात. त्यांना पकडून अमेरिकेंत पाठविल्यास डॉलर्सची प्राप्ति होऊं शकेल.

**हिंदी जीवनविषयक रशिअन चित्रपट**—मॉस्कोंतील अनुबोधपट काढणाऱ्या स्टुडिओनें ‘भारतांत’ ह्या नांवाचा एक अनुबोधपट तयार केला असून सध्या तो रशिआंत दाखविण्यांत येत आहे. चालू वर्षाच्या प्रारंभीं आंतरराष्ट्रीय बोलपट प्रदर्शनासाठी रशिअन प्रतिनिधी मंडळ आलें होतें. त्यामधील तज्ज्ञांनीं हा अनुबोधपट भारतामधील निरनिराळ्या शहरीं जाऊन तयार केला. तो रंगीत आहे.

## सोन्याची चोरटी आयात व सोन्याचा बाजारभाव

### कोलार गोल्डफील्डवरील चार सोन्याच्या खाणींच्या कंपन्यांचे चेअरमन, श्री. श्रीनिवासन, ह्यांचें भाषण

"सोनें हा अद्याप आंतरराष्ट्रीय चलनाचा आधार आहे, आणि मामुली काळांत त्याची खुली किंमत हें चलनवाढीचें-घटीचें निदर्शक असतें. कित्येक वर्षे, सोन्याचा भाव मालाच्या किंमती व रहाणीचें मान ह्यांच्या पाठोपाठ हळुहळु वाढत गेला आहे. रुपयाच्या क्रयशक्तीमधील फरकाप्रमाणें सोन्याच्या किंमतींतहि फरक पडत असे. फेब्रुवारीमधील बँक-रेटच्या वाढीमुळें आणि बँकांनीं कर्जांचे व्यवहार जवळजवळ बंदच केल्यामुळें मंदीची तीव्रता अधिकच वाढली. त्यामुळें बँकांची मार्जिन्स भरण्यासाठीं किंवा तोटे भरून काढण्यासाठीं सोन्याचे मोठे साठे बाजारांत आले. ह्या सर्व गोष्टींमुळें, ताग आणि टाटा डिफर्ड ह्यांचे साथीदार सोन्यास बनावें लागलें.

"सोन्याची चोरटी आयात करणारांच्या कारवायांशींहि सोन्याच्या किंमतीचा निकटचा संबंध आहे. भारतांत खपणाऱ्या एकूण सोन्यापैकीं निम्म्यापेक्षां ज्यास्त सोनें चोरट्या आयातीच्या द्वारें येतें! ज्या देशांत सोन्याची कमाल किंमत नियंत्रित आहे आणि खुली खरेदी-विक्री निषिद्ध आहे, तेथें बंधनें मोडण्याची धडपड चालू असते, आणि तेथील लहान-मोठ्या बंदरांतून सोन्याचे चोर-बाजार चालू असतात. चोरटें सोनें भारतांत किती किंमतीस येऊन पडेल, हें ह्या चोर-बाजारांतील साठे व व्यवहार ह्यांवर अवलंबून रहातें. गोवा, कुवेत (इराणी आखाताच्या वायव्य किनाऱ्यावर) आणि मॅकओ (कँटन नदींतील बेट) येथील सोन्याच्या लपून छपून चाललेल्या व्यापाराशीं मुंबईमधील सोन्याच्या किंमतीचा संबंध पोंचतो. भारतांत सध्यां सोन्याची जी किंमत आहे, ती चोरट्या आयातीस आकर्षक वाटण्याजोगी नाहीं. परंतु, सोन्याच्या उत्पादकांस किफायतशीर होणार नाहीं, इतक्या खालीं ती किंमत गेली नसती, तर हा उतार स्वागतार्हच झाला असता. सोन्याच्या किंमतीचा उतार उत्पादक कंपन्यांना हानिकारक झाल्याविना रहाणार नाहीं."

---

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, वडगांव मावळ

"पुणें जिल्ह्यांत सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास वडगांव मावळ येथें ता. ७-८-१९५२ ते २१।९।१९५२ अखेर मुदतीचा भरणार आहे. ज्या उमेदवारांस सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं खालील सही करणार यांजकडे ता. ३१।७।१९५२ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. ३ पाठवावी. उमेदवाराचें शिक्षण निदान व्ह. फा. पास झालेला अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. क्लास फी भरल्यानंतर कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाहीं. उमेदवारांनीं, वडगांव मावळ येथें, पुणें सेंट्रल को-ऑप-बँक-शाखा-वडगांव मावळ चे ऑफिसांत समक्ष ता. ७-८-१९५२ रोजीं १२ वाजतां बिनचूक हजर व्हावें.":- के. बी. देशपांडे, को. ट्रे. इन्स्पेक्टर, १४८७ शुक्रवार, पुणें.


# — वेस्टर्न इंडियाचें —

## यशस्वी कार्य.

भरीव काम व निश्चित प्रगती याबद्दलची आपली उज्वल परंपरा वेस्टर्न इंडियानें १९५१ सालींही कायम राखली आहे.

### १९५१ मधील कांहीं ठळक वैशिष्ट्यें

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण नवीन काम | ... | ... | रु. १½ कोटींवर |
| एकूण चालू काम | ... | ... | रु. १६ कोटींवर |
| एकूण हप्त्यांची आवक | ... | ... | रु. ८६ लाखांवर |
| एकूण आयुर्निधी | ... | ... | रु. ५ कोटींवर |
| एकूण क्लेम्स दिले | ... | ... | रु. १¾ कोटींवर |

**दर हजारीं आकर्षक त्रैवार्षिक बोनस**

| हयातींतील विमा | हयातीनंतरचा विमा |
|---|---|
| रु. २७।- | रु. ३३।- |

हप्त्यांचे दर मात्र पूर्वींचेच अत्यंत माफक. आपला विमा व प्रतिनिधित्वासाठीं एक सर्वोत्कृष्ट आदर्श विमा संस्था. उत्कृष्ट व लाभदायक जीवन-व्यवसाय हवा असणाऱ्या उत्साही व महत्त्वाकांक्षी तरुणांना विमा क्षेत्रांत भरपूर वाव.

सविस्तर माहितीसाठीं भेटा वा लिहा.

—: मॅनेजर :—


**वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., सातारा.**

शाखा कचेरीः—१७३, बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें. फोन नं. १४०१

कँप ऑफिसः—C/o क्रेसवेल्स, ईस्ट स्ट्रीट, पुणें.

# अर्थ

बुधवार, ता. ९ जुलै, १९५२


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चलन–संकोचाची चिनी जादुगिरी ?

कम्युनिस्ट चीनमध्यें गेलेलें भारताचें सदिच्छा–मंडळ परत आल्यानंतर चीनमधील नवीन राजवटीविषयीं मंडळाच्या सदस्यांनीं अनेक प्रकारची माहिती जाहीर रीतीनें सांगितली आहे. मंडळाचे एक सभासद श्री. हर्षीसिंग ह्यांनीं चीनमधील अफाट चलनविस्तार आणि नवीन राज्यकर्त्यांनीं चलनाचा संकोच करण्यांत मिळविलेलें यश ह्यासंबंधीं पुढील उपयुक्त माहिती निवेदन केली. आर्थिक घडामोडींवर सरकारचें प्रभावी नियंत्रण असलें, तर इच्छित मार्गानें प्रगति कशी होऊं शकतें हें त्या माहितीवरून दिसून येतें.

चीनमध्यें क्युओमिन टांग पक्षाचें राज्य असतांना चलनी नोटा इतक्या वाढल्या होत्या कीं वस्तूंच्या किंमती दर तासाला वाढत असत. अर्थात् पगार अगर वेतन हातीं आल्याबरोबर मिळतील त्या वस्तू खरेदी करून ठेवण्यासाठी चिनी नागरिक हपापलेले असत. चिनी चलनाची किंमत अशी अस्थिर असतांनाच अमेरिकन डॉलरला मात्र फार मागणी असे. ह्याचा परिणाम असा झाला होता कीं, चीनच्या अर्थव्यवस्थेंतील ४० टक्के भागावर अमेरिकन डॉलर्सची हुकमत चालत असे. लाल चीनची राजवट आल्यावर पीपल्स बँकेचे गव्हर्नर नॅनहॅन–चेन ह्यांनीं ही परिस्थिति काबूंत आणली. वस्तूंच्या विनिमयांत चलनी नोटांचें योग्य स्थान त्यांना प्राप्त करून देणें ही पहिली कामगिरी त्यांनीं पार पाडली. लोकांनीं आपले पैसे पीपल्स बँकेंत ठेवावे म्हणून असें जाहीर करण्यांत आलें कीं, जे लोक कांहीं ठराविक रक्कम बँकेंत आणून ठेवतील त्यांना कापड, तांदूळ, तेल व कोळसा ह्यासारख्या नित्य जरूरीच्या वस्तू त्यावेळेच्या भावाप्रमाणें मिळतील. त्यांना चढते भाव द्यावे लागणार नाहींत. त्यानंतर सरकारनें बाजारांत खरेदीस सुरवात करून ह्या जिनसांचे मोठेमोठे साठे स्वतःच खरेदी केले आणि त्यांच्या किंमती चढूं लागल्याबरोबर त्या वस्तू स्वतःच विकण्यास सुरवात केली. त्यामुळें ह्या वस्तूंचे चोर-साठे बाजारांत आले आणि साठे करण्याची प्रवृत्ति कमी होऊं लागली.

सरकारी अंदाजपत्रक ठाकठीक करण्याची कामगिरीहि हातीं घेण्यांत आली. सरकारी खर्चांत शक्य तितकी काटकसर करण्यांत आली; चैनबाजीला आळा घालण्यांत आला. आज तर कित्येक सरकारी अधिकारी नाममात्र पगारावर काम करीत आहेत. बहुतेक सरकारी नोकरांना जेवणखाण व रहाण्याची जागा फुकट देण्यांत येते. त्यांच्या मुलांचें शिक्षणहि फुकटच होतें. अर्थात् ह्या बाबतींत किमान सवलतींची मर्यादा घालून देण्यांत आली आहे. पगारांच्या श्रेणी ऐकून भारतांत आश्चर्यच वाटेल. चीनचे अध्यक्ष माओ–त्से–तुंग ह्यांना सुमारें ८०० रुपये पगार मिळतो. चीनचें अंदाजपत्रक आतां तोंडमिळवणीचें झालें आहे असें म्हणतात. देशांतील दळणवळणाची व्यवस्था पुन्हां नीट चालूं करण्यांत आली आणि व्यापाराचे मामुली मार्ग खुले करण्यांत आले. जे आर्थिक व्यवहार तेजी–मंदींतील फरक खाण्याच्या स्वरूपाचे असतील, त्यांना कर्जें देण्याचें बंद करण्यांत आलें. परकीय चलन आणि सोनें ह्यांना व्यवहारांत बंदी करण्यांत आली आणि सरकारनें अगदी कमी भावांत त्यांची खरेदी केली. परकीय हुंडणावळींचा चिनी चलनाशीं योग्य तो दर पडावा म्हणून ती कारवाई करण्यांत आली. दोन वर्षे अशी व्यवस्था चालल्यावर अलीकडे पदार्थांच्या किंमती बऱ्याच स्थिर झाल्या आहेत. पीपल्स बँक ग्राहकांकडून ठराविक रकमेची ठेव अजूनहि घेते. कारण ह्या ठेवीमुळें त्यांना जरूरीच्या वस्तू त्या त्या वेळच्या भावाप्रमाणें मिळतात. परंतु ह्या पद्धतीचें महत्त्व किंमती स्थिरावल्यामुळें आतां बरेंच कमी झालें आहे. चलनपद्धतींत इतके फेरफार करून सुद्धां चीन आज मोठें लष्कर उभारूं शकतो, ह्युई–नदी–योजनेसारख्या योजना उत्पन्नांतून पार पाडूं शकतो आणि कोरिआंतील युद्धाचा खर्च करूं शकतो. नियंत्रित अर्थपद्धतींत ह्या गोष्टी शक्य असतात. कारण, व्यवहारांत असलेलें चलन आणि किंमती ह्यांचा संबंधच ह्या अर्थपद्धतींत नसतो.

कम्युनिस्टांची राजवट आल्यावर त्यांनीं प्रथम द्रव्य–विषयक व्यवहार एकसूत्री केले आणि करांचा वसूल कार्यक्षम केला. तरी सुद्धां स्वतःच्या औद्योगीकरणाच्या कार्यक्रमाला जरूर असलेलें भांडवल चीन बचतींमधून उभारूं शकेल किंवा काय हा प्रश्नच आहे. पीपल्स बँकेचे गव्हर्नर चेन म्हणतात कीं, शेतीचें उत्पादन वाढलें असल्यामुळें सामान्य चिनी नागरिक बचत करून हें भांडवल उभारूं शकेल. त्याशिवाय शिलकीचें अंदाजपत्रक आणि परदेशीय व्यापारांतील अनुकूल तफावत ह्यांचीहि मदत भांडवल–घडणीस होऊं शकेल. चिनी सरकारच्या उत्पन्नाच्या मुख्यतः तीन बाबी आहेतः– ( १ ) प्राप्तीवरील आणि व्यापारी उलाढालीवरील कर, ( २ ) सरकारच्या मालकीच्या उद्योगधंद्यांचें उत्पन्न आणि ( ३ ) शेतसारा. १९५० सालीं चिनी लोकसत्ताक राज्याची स्थापना झाल्यापासून सरकारनें फक्त एकदांच कर्ज उभारलें. त्या कर्जाचा उद्देश चलन–संकोच करण्याचा होता. गेल्या वर्षी अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी झाली असल्यामुळें आणि ह्या वर्षी शिलकीचें अंदाजपत्रक अपेक्षित असल्यामुळें दीर्घकालीन विकास–योजनांसाठी पुन्हा कर्ज उभारावें लागणार नाहीं, असा अंदाज करण्यांत आला आहे. देशाच्या चलन व द्रव्यविषयक व्यवहारावर मध्यवर्ती सरकारचें कडक नियंत्रण असतें. स्थानिक सरकारांना मध्यवर्ती सरकाराकडून ठराविक रकमा मिळतात. कोरिया–मदत–फंडासारख्या स्वेच्छेच्या वर्गण्यांमुळेंहि चलनसंकोचाला मदत झाली.

चीनमधील जमीन–धारणेच्या व्यवस्थेंत सुधारणा करणारा कायदा करण्यांत आल्यावर शेतकऱ्यांना करण्यासाठी जमिनी मिळाल्या. त्यावेळीं पीपल्स बँकेनें शेतकऱ्यांना सुमारें २०० कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं. व्याजाचे दर ७॥ टक्क्यापासून १२ टक्क्यापर्यंत आणि कर्जाच्या मुदती ५ ते ८ वर्षांपर्यंत होत्या. सध्यां चीनच्या अर्थव्यवस्थेची समतोलता जरा बिघडली आहे

ही गोष्ट मि. नॅन-हॅन-चेन हे कबूल करतात. शेतीच्या व औद्योगिक उत्पादनांत जो तफावत आहे तिचा हा परिणाम आहे असें त्यांचें म्हणणें आहे. शेतीच्या मालाच्या किंमती योग्य पातळीवर राखण्यासाठी चीनचें सरकार शेतीचा माल सध्या विकत घेत आहे. ह्या मालाच्या किंमती खुल्या बाजारांतच ठरतात; पण सरकारजवळील सांठ्यामुळें त्यांच्या किंमतीवर दाब रहातो. गेल्या कांहीं महिन्यांत ग्राहकांना लागणाऱ्या इतर वस्तूंच्या किंमती ६ ते ८ टक्क्यांनीं उतरल्या; पण शेतीच्या मालाच्या मात्र स्थिर राहिल्या आहेत. चीनवर अमेरिकेनें व इतर पाश्चात्य राष्ट्रांनीं जो व्यापारी बहिष्कार घातला आहे त्यामुळें आणि सरकारी व्यापारामुळें चीनचा परदेशीय व्यापार अनुकूल तफावतीचा आहे. आज चीनला कापडासारख्या ग्राहकांच्या वस्तूंची फार गरज आहे. अशा वस्तूंसाठी रोख रक्कम देण्याची चीनची तयारी आहे. यांत्रिक व सहकारी शेतीमुळें चीनमधील शेतावर राबणाऱ्या मजुरांना इतर ठिकाणीं कामें पहावीं लागत आहेत. म्हणूनच चीनला औद्योगीकरण करणें जरूरीचें आहे. चीनमध्यें अंतर्गत भांडवल भरपूर आहे, पण त्याच बरोबर परकीय भांडवलाचें स्वागत करण्याचीहि चीनची तयारी आहे. अर्थात् असें भांडवल परस्परांना साहाय्यक होणारें आणि बरोबरीच्या नात्यानें आलेलें असलें पाहिजे. सध्यांच्या परिस्थितींत परकीय भांडवल चीनमध्यें येणें कितपत शक्य आहे, हा प्रश्नच आहे.

### रेड क्रॉसचा जनक

रेड क्रॉसचें नांव नेहेमी ऐकूं येतें, परंतु त्या कार्याच्या कल्पनेचा उगम पुष्कळांना माहीत नाहीं. ऑस्ट्रियाविरुद्ध इटली व फ्रान्स ह्यांची कॅस्टिग्लिओन येथें जोराची लढाई चालू होती, तेव्हां त्यांत जखमी झालेल्यांना इस्पितळांत जाऊन भेटणाऱ्या जीन हेन्री डुनांट ह्या स्विस माणसास, युद्धकाळांत जखमी झालेल्यांची काळजी वहाणाऱ्या संघटनेचें महत्त्व पटलें. त्याची सूचना गस्टाव मॉयनिरनें उचलून धरली व पांच जणांची एक कमिटी नेमण्यांत आली, तिचे प्रयत्नांनीं १८६३ मध्यें जिनीव्हा येथें एक परिषद् बोलाविण्यांत आली. तिला १८ युरोपियन राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ह्या परिषदेंत रेड क्रॉस संघटनेचा पाया घालण्यांत आला. पुढील वर्षी सुप्रसिद्ध जिनीव्हा करारावर सह्या झाल्या.

### कोरिया-जपान विभागांतील सैनिकांचे गुप्तरोगास बळी

कोरिया-जपान क्षेत्रांतील लष्करी सैनिकांत गुप्त रोगाचा फैलाव वाढत आहे. एकूण सैनिकांपैकीं २०% सैनिक दरसाल त्याला बळी पडतात. गेल्या वर्षापेक्षां हें प्रमाण ज्यास्त आहे. युरोपांतील तत्सम प्रमाण ६.६ % आणि अमेरिकेंतील प्रमाण २.४ % आहे. कोरिया-जपानमधील सलाशांत हें प्रमाण १२% आहे. अमेरिकन वैद्यकीय अधिकाऱ्यांना ही परिस्थिति चिंताजनक वाटत आहे.

### घाऊक मालाच्या किंमतींचा निर्देशांक

घाऊक मालाच्या किंमतींचा इंडेक्स नंबर ( १९३९=१०० ) १४ जून अखेरच्या आठवड्यामध्यें ३७२.२ झाला. मेच्या तत्सम आठवड्यापेक्षां हा १.७% ज्यास्त आहे, परंतु १९५१ च्या तत्सम आठवड्यापेक्षां १८.७% कमी आहे.

### शिरगणतीचा खर्च

१९५१ च्या शिरगणतीस एकूण १ कोटी, ५० लक्ष रुपये खर्च आला.

## विमा धंद्याविषयीं भावी अपेक्षा

### वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. चे चेअरमन, डॉ. मो. ना. आगाशे, ह्यांचें भाषण

" प्रतिवर्षी जरी आपले कामांत वाढ होत राहिली तरी एवढ्यावरच समाधान मानून भागणार नाहीं. मिळविलेलें काम टिकविण्यासाठी व आमच्या विमेदारांना आणि हक्कदारांना जास्तींत जास्त सहकार्य व सेवा देण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करीत असतों. आतापावेतों भारतांत विमाव्यवसायाची वाढ बेताचीच झालेली आहे. कारण भारताची लोकसंख्या साडेपस्तीस कोटींवर असून १९५१ च्या सरकारी इतिवृत्ताप्रमाणें १९५० अखेर भारतांतील एकूण चालू विम्याच्या पॉलिसी ३२,८०,००० असून एकूण चालू काम ७४४ कोटी ६२ लाखांचे सुमारास असल्याचें आढळतें. यावरून हें अगदीं स्पष्ट होतें कीं, एकूण लोकसंख्येपैकीं अवघ्या ½ टका लोकसमुहानें विमा-संरक्षण घेतलें असून अद्यापि या धंद्याचे वाढीस भरपूर वाव आहे. सरकारही आपल्या परीनें उत्तरोत्तर समाजाचें राहणीचें मान वाढावें एतदर्थ नवीन योजना आंखीत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. त्या दृष्टीनें कारखान्यांतील नोकरवर्गासाठी प्रॉव्हिडंट फंड, त्याचप्रमाणें आजारीपण, अपघातप्रसंगीं तांतडीची मदत देण्याची सरकारी विमा योजना या विमा-व्यवसायास एकंदरींत सहाय्यकारीच ठरणार आहेत. कारण निरनिराळ्या धंद्यांतील एकूण नोकरवर्ग अंदाजीं १६ लाखांपर्यंत असून त्यायोगें त्या वर्गामधून विमानुकूल वृत्ति वाढीस लागणेस त्यांचा निश्चित उपयोग होईल व नजीकच्या भविष्य काळांत ज्या वर्गातून या वेळपावेतों विशेषसें विम्याचें काम मिळत नसें असें हें मोठें क्षेत्र विमाव्यवसायास उपलब्ध होईल. अर्थातच त्याचा योग्य तो उपयोग आपण करून घेऊन या मोठ्या वर्गास पुरेसें विमासंरक्षण देण्याचा प्रयत्न करून सरकारनें सुरू केलेल्या या उपक्रमाचा मूळ हेतु सिद्धीस नेणें जरूर आहे. हें साध्य साधण्यासाठी विम्याशीं संलग्न असणाऱ्या मंडळींच्या मनांत समाजसेवेची वृत्ति बाणावयास पाहिजे; म्हणजे समाजाला आकर्षण करणारी कार्यक्षमता त्यांचे अंगीं उत्पन्न होऊन आपल्या या धंद्याचा व्याप हळुहळू पण निश्चितपणें सर्वत्र वाढवितां येईल. त्या दृष्टीनें आपण आधींच पाऊल टाकलें असून क्रमाक्रमानें नवीन नवीन मंडळी शिकून तयार होत आहेत, परंतु ही योजना दीर्घकालीन असून तिचा पाठपुरावा आपण धिमेपणानें केला पाहिजे. असें केल्यानें भावी काळांत नवीन काम आपण समाधानकारक मिळवूं शकूं अशी मला उमेद वाटते. "

( वार्षिक सभा, २२-६-१९५२ )

**उद्योगधंद्यांना द्यावयाच्या मदतीची मर्यादा**—मद्रास सरकारनें असें ठरविलें आहे कीं, नव्या उद्योगधंद्यांना सरकारतर्फे जी मदत देण्यांत येते तिची रक्कम प्रत्येक धंद्यामागें ५० हजार रुपयांपेक्षां जास्त असू नये. ह्यापेक्षां जास्ती मदत ज्या धंद्यांना पाहिजे असेल त्यांनीं मद्रास इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लि. ह्या कंपनीकडे अर्ज करावयाचे आहेत.

**जमीनदारीच्या समाप्तीच्या दुंदुभि**—उत्तर-प्रदेशांतील जमीनदारी हक्कांची समाप्ति ता. १ जुलै रोजीं करण्यांत आली. त्यावेळीं राज्यांतील १,०७,००० खेडेगांवांतून ढोल बडविण्यांत आले. राज्यांतील २० लाख छोट्या-मोठ्या जमीनदारांचे हक्क ह्या दिवशीं संपले. ३६ हजार ग्रामपंचायतींनीं ह्या समारंभांत भाग घेतला होता.

## वेस्टर्न इंडिया आयुर्विमा कंपनी लि., सातारा

१९५१ मध्यें एकंदर २,६८,५२,३५८ रुपयांचे विमे दिले गेले, नवीन दिल्या गेलेल्या विम्याच्या वार्षिक हप्त्यांची रक्कम रु. १३,४२,८०१–१५ होत आहे आणि सिंगल प्रीमियमची रक्कम रु.६७,५४६-७० होत आहे. या व्यतिरिक्त वर्षासन योजनेखालीं ७० विमापत्रकें देण्यांत आलीं. सन १९५० सालच्या सरकारी वार्षिक अहवालानुसार हिंदुस्थानांतील एकूण नवीन विम्याचे कामांत सन १९४७ सालापासून उत्तरोत्तर घट दिसून येत आहे. अशा परिस्थितींतहि कंपनीनें लागोपाठ दरवर्षी वाढतें नवीन विम्याचें काम करून आपली उज्ज्वल परंपरा सिद्ध केली हें नमूद करण्यास आनंद वाटतो. युद्धोत्तर उत्पन्न झालेल्या प्रस्तुतच्या कठीण परिस्थितींतहि कंपनीनें समाधानकारक प्रगति केली असून या वर्षांत आयुर्निधीमध्यें रु ३८,९३,१६५–७–४ भर टाकली. आतां तो निधी रु. ५,०५,६१,८३९–८–३ झाला आहे. सन १९५१ अखेर बाजारभावानें कंपनीच्या रोख्यांची एकूण किंमत रुपये ४,१८,२०,५५६ होत असून कंपनीच्या ताळेबंदांत दिसणारी पुस्तकी किंमत रुपये ४,४०,९४,७७७ आहे. म्हणजे, पुस्तकी किंमतींपेक्षां बाजारभावानें येणाऱ्या किंमतींत रु. २२,७४,२२१ इतकी घट आहे व त्याकरितां इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड रु. २२,७५,००० काढून ठेविला आहे. भागीदारांना डिव्हिडंड देण्यासाठी म्हणून राखून ठेवलेल्या डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडांतून सन १९५१ साठीं ३० टक्के विना कर डिव्हिडंड देण्यांत आलें.

१९५१ साल कंपनीस वाढत्या यशाचें गेलें. गतवर्षी रोख्यांच्या बाजारभावानें येणाऱ्या किंमतींत जी घट दिसत होती ती भरून काढण्याइतका इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड ( २२॥ लक्ष रु. ) झाला आहे. निव्वळ व्याजाचे दरांतहि चांगली सुधारणा झाली आहे. खर्चाचें प्रमाण आणखी खाली गेलें आहे. गतवर्षी विमेदार व त्यांचे वारस ह्यांच्या सुमारें १,५०० कुटुंबांकडे कंपनीनें २३ लाखांवर विम्याची रक्कम पोंचवून विम्याच्या उपयुक्ततेचा अनुभव त्यांस आणून दिला. १९५० मध्यें २ कोटी, ६३॥ लक्ष रु. चें नवीन काम पुरें झालें होतें, तें १९५१ मध्यें २ कोटी, ६८॥ लाखांवर झालें. म्हणजे, गेलें वर्ष कंपनीच्या उज्वल परंपरेस धरूनच गेलें.

कंपनीचें १९५१ अखेरचें मूल्यमापन कंपनीचे ॲक्चुअरी, श्री. कृ. य. जोशी, बी. ए., एफ. आय. ए., ह्यांनीं केलें आहे. मूल्यमापनासाठी व्याजाचा दर २·८७५% धरला, परंतु प्रत्यक्ष व्याज ३·५४% मिळालेलें आहे. रिन्युअल हप्त्यांवरील खर्चाचें प्रमाण मूल्यमापनाचे काळांत ११·७७% पडलें, तें तरतुदीपेक्षा बरेंच कमी आहे. मूल्यमापनांत, वाढाव्यांतून विमेदारांस बोनस वाटण्यासाठी २०,८१,२४६ रु. राहिले. त्यांतून मूल्यमापनाचे ३ वर्षांचे मुदतीबद्दल अनुक्रमें द. सा. द. ह. ११ रु. व ९ रु. बोनस वाटण्याचें ठरलें आहे. "सदर मूल्यमापनावरून कंपनीची आर्थिक सुस्थिति, प्रगति व उत्कर्ष अबाधित राखलीं गेलीं आहेत, हें दिसून येईल. आपल्या कंपनीची एक अनुकरणीय व सर्वांगीण नमुनेदार संस्था अशी ख्याती आज भारतवर्षांत होऊन तिची गणना प्रमुख विमा कंपन्यांत प्राधान्यानें केली जाते, याचें श्रेय कंपनीचे ॲक्चुअरी व मॅनेजर श्री. बाळासाहेब जोशी, बी. ए., एफ. आय. ए., ह्यांना देणें योग्य होईल" असा श्री. जोशी यांच्या कामगिरीचा गौरव चेअरमन, डॉ. मो. ना. आगाशे, ह्यांनीं वार्षिक सभेंतील भाषणांत केला आहे. वेस्टर्न इंडियाला विमाजगतांत जें मानाचें स्थान आहे, त्याचें सर्व श्रेय कै. श्री. अण्णासाहेब चिरमुले ह्यांना आहे. त्यांच्या कार्यपद्धतीनेंच कंपनीचें काम अव्याहत चालू असल्यानें, स्थैर्य, विमेदारांच्या हिताची जपणूक, काटकसर, निःस्वार्थीपणा, इत्यादि गोष्टींबद्दल खात्री बाळगण्यास कांहींच हरकत नाहीं आणि कंपनीची प्रगति व हिशेबाचे आंकडे हेहि तेंच दर्शवितात.

---

### अमेरिकेचें स्वदेशी कारखानदारांस प्रोत्साहन

अमेरिकेच्या परराष्ट्रीय व्यापारांत आतां थोडी अडचण निर्माण झाली आहे. अमेरिका दरसाल परदेशांना कोट्यवधि डॉलर्सची मदत करून त्यांना स्वतःच्या पायावर उभें रहाण्यास सहाय्य करीत आहे. परंतु त्या देशांना डॉलर्स कमावण्यासाठी अमेरिकेंत कांहीं माल विकतां आला नाहीं, तर ते देश अमेरिकेशीं व्यापार न करतां रशियाकडे वळण्याचा संभव आहे. अमेरिकेनें आपली आयात कमी केली, तर अमेरिकेची निर्गत आपोआप कमी झाल्याविना रहाणार नाहीं. अमेरिकन कारखानदारांच्या अडचणी लक्षांत घेऊन, तेथील सरकार संरक्षक जकाती वाढवीत आहे. त्यामुळें परदेशी मालास अमेरिकेंत बाजारपेठ मिळणें अधिकाधिक अवघड होत चाललें आहे. अमेरिकेनें इतर देशांना मदतीदाखल दिलेला माल इतर देशांच्या आगबोटींचे दर कमी असले तरी सुद्धां अमेरिकन मालवाहू आगबोटींतूनच वाहिला पाहिजे असें बंधन घातलेलें असतें. लोणी, तेलें, इत्यादींची आयात अमेरिकेनें पूर्णपणें बंद केली असून चीजच्या आयातींवर निर्बंध आहेत. सरकारी माल खरेदींत अमेरिकन मालास, इतर देशांचा माल ( आयात जकात भरूनहि ) २५% स्वस्त असला तरी, प्राधान्य दिलें पाहिजे असा अमेरिकन सरकारचा दंडक आहे. अमेरिकन कारखानदारांनीं विदेशी मालाच्या स्पर्धेबाबत तक्रार केली, तर टॅरिफ कमिशनमार्फत त्याची तात्काळ चौकशी केली जाते व उपाययोजना केली जाते.

---

### इंडियन रेव्हिन्यू सर्व्हिस

'इंडियन रेव्हिन्यू सर्व्हिस' या नांवाचा अेक नवीन पहिल्या वर्गाचा मध्यवर्ती नोकरवर्ग तयार करण्याचा भारत सरकारनें निर्णय घेतला आहे. या नव्या वर्गांत जकात, प्राप्तीकर आणि मध्यवर्ती अबकारी खातें यांमधील १ल्या श्रेणींतील सर्व अधिकाऱ्यांचा अंतर्भाव करण्यांत येऊन त्यास १ जुलै, १९५२ पासून सुरवात झाली. महसूलवसुलीशीं संबंध असलेल्या खात्यांच्या कार्यक्षेमतेंत आणखी सुधारणा करण्याच्या प्रश्नावर भारत सरकारचा विचार चालू होता, आणि त्या दिशेनें उपाययोजना करण्यासाठी म्हणून ही 'सर्व्हिस' निर्माण करण्यांत आली आहे. 'अिंडियन रेव्हिन्यू सर्व्हिस' मध्यें जकात, प्राप्तीकर आणि मध्यवर्ती अबकारी असे तीन स्वतंत्र विभाग राहतील. या तिन्ही विभागांतील अधिकारी कांहीं एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आपापल्या विभागांत काम करतील व त्यानंतर त्यांच्या एका विभागांतून दुसऱ्या विभागांत बदल्या करण्यांत येतील. प्राप्तीकर–विभागांतील अधिकारी असिस्टंट कमिशनरच्या हुद्यापर्यंत आपापल्या श्रेणींतच काम करतील. तेथपर्यंत त्यांच्या जकात आणि मध्यवर्ती अबकारी या विभागांत किंवा विभागांतून बदल्या केल्या जाणार नाहींत. त्याचप्रमाणें जकात व मध्यवर्ती अबकारी–विभागांतील अधिकारी असिस्टंट कलेक्टर या हुद्यावर असेपर्यंत आपापल्या श्रेणींत काम करतील. परंतु डेप्युटी कलेक्टर व त्यापुढील हुद्यांवर येण्याच्या अवस्थेच्या वेळीं जकात आणि मध्यवर्ती अबकारी विभागांतील अधिकाऱ्यांची व्यक्तिगत पात्रता लक्षांत घेऊन या विभागांतून त्या विभागांत बदल्या होतील.

## औद्योगिक स्थिरता व आर्थिक विकास

### रिझर्व्ह बँकेच्या उपाययोजनेवर श्री. योधराज यांची टीका

( मा. म. का. )

पंजाब नॅशनल बँकेच्या वार्षिक सभेच्या वेळीं, ता. ८ मे १९५२ रोजीं अध्यक्ष श्री. योधराज यांनीं आजच्या बँकिंगच्या परिस्थितीच्या दृष्टीनें महत्त्वाचें भाषण केलें. त्यांतील कांहीं मुख्य मुद्दे पुढें दिले आहेतः—अलिकडची मंदी पैशाबद्दल मागणी तीव्र असणाऱ्या काळांत निर्माण झाली. त्यामुळें तिचे परिणाम व्यापाराच्या दृष्टीनें दूरवर पोंचणारे ठरतील. १९४९-५० सालीं बँकांना ७९ कोटी, ६९ लक्ष रु. पैसा पुरवावा लागला तर १९५०-५१ च्या हंगामाच्या काळांत १७० कोटी, ६४ लक्ष रु. पैसा पुरवावा लागला. १९५१ च्या डिसेंबरमध्यें १९५० च्या डिसेंबरच्या मानानें ७५ कोटी रु. जास्त पुरवावे लागले. परंतु ८ फेब्रुवारी १९५२ रोजीं बँकांना ५७४ कोटी ९२ लक्ष रु. रकमेची तरतूद करावी लागली. डिसेंबर १९५१ मध्यें पैशाला जोरदार मागणी असते. अशा वेळीं संलग्न बँकांची त्वरित पैशांत रूपान्तरित करण्यासारखीं साधनें अंदाजें ४६० कोटी ४६ लक्ष रु. असून, ठेवींच्या मानानें तीं सुमारें ५१ टक्के होतीं व प्रत्यक्ष रोकड १२·२ टक्के असल्यामुळें पैशाची हंगामी मागणी पुरविणें बँकांना कठीण जाऊं लागलें. संलग्न बँकांची रिझर्व्ह बँकेच्या या बाबतींत प्रसिद्ध होणाऱ्या आंकड्याप्रमाणें गुंतवणूक ३१०कोटी ४१ लक्ष रु. असून ती एकूण ठेवींच्या ३४·४ टक्के होती. यामुळें हंगामी मागणी पुरविण्यासाठीं बँकांजवळ ४० कोटी रु. उपलब्ध होते, व कायद्याप्रमाणें १३० कोटी रु. देतां आले असते परंतु एवढी रक्कम सुरक्षिततेच्या दृष्टीनें देणें शक्य नव्हतें. पूर्वीच्या काळीं बँका अशावेळीं ट्रेझरी बिलें व सरकारी रोखे यांची विक्री करीत असत. फाळणीनंतर सरकारी रोख्यांच्या बाबतींत विकेत्यांची बाजारपेठ नष्ट झाली आहे, व कांहींशी खरेदीदारांची बाजारपेठ सुरू झाली आहे. रिझर्व्ह बँक संलग्न बँकांपासून सरकारी कर्जरोखे विकत घेत होती तोंपर्यंत बँकांना हंगामाच्या काळांत व्यापारासाठीं पैसा पुरविणें शक्य होत असे. रिझर्व्ह बँकेनें संलग्न बँकांना पैसा उभारण्याच्या बाबतींत शक्य ती मदत केली पाहिजे. असल्या पैशाच्या धोरणामुळें रिझर्व्ह बँकेला औद्योगिक स्थिरता व राष्ट्रीय विकास साधतां येईल. पूर्वी इंपीरियल बँकेला हंगामाच्या काळांत करन्सी राखीव शिलकींतून आगाऊ रकमा व्यापाराच्या सोयीसाठीं उचल करतां येत असत. तसा उपायहि आतां रिझर्व्ह बँकेनें संलग्न बँकांच्या बाबतींत सुरू केला पाहिजे. हें साध्य करण्यासाठीं अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेप्रमाणें रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत सुधारणा झाली पाहिजे. लंडन व न्यूयॉर्क या व्यापारी शहरांतहि व्यापारी बँकांना मध्यवर्ती बँकेच्या मदतीशिवाय पैशाच्या हंगामाच्या वेळांत जरूर तो पैसा उभारणें कठीण जातें. अलीकडे संलग्न बँकांना रीडिसकाउंटबद्दलच्या सोयी रिझर्व्ह बँकेनें पुरविल्या आहेत, परंतु इतर देशांप्रमाणें या बाबतींत आणखी सुधारणा झाली पाहिजे. अर्थात रिझर्व्ह बँकेनें अशा सोयी ऐन हंगामाच्या व विशेष जरूरीच्या वेळींच फक्त पुरविल्या पाहिजेत. सामान्य परिस्थितींत अशा सोयींची आवश्यकता नाहीं.

बँक-रेट वाढविल्याबद्दल याचें भाषणांत श्री. योधराज म्हणाले कीं 'स्वस्त पैशाचें' धोरण बदलण्यासाठीं बँक-रेट वाढवून पैशाला मागणी कमी असते अशा मंदीच्या काळांत सुरवात करणें योग्य ठरलें असतें. कारण पैशाला मागणी कमी असते अशा काळांत व्यापारी लोक आयात व निर्गत या बाबतींत करार करतात. बँक रेट मागणी कमी असते अशा वेळीं वाढविला असता तर व्यापारी लोकांनीं सावधपूर्वक व्यवहार केले असते व त्यामुळें फेब्रुवारी अखेर सुरू झालेली मंदी कदाचित टळली असती. हिंद सरकारनें आपलें बजेट मार्चमध्यें न करतां मान्सून पावसानंतर तयार करणें सोईस्कर जाईल अशीहि सूचना श्री. योधराज यांनीं केली. खुल्या बाजारांतील व्यवहार, योग्य प्रकारच्या रीडिसकाउंटिंग बद्दलच्या सोयी व विचारपूर्वक स्वस्त पैशाच्या धोरणांतील बदल या तीन गोष्टींनीं रिझर्व्ह बँक औद्योगिक स्थैर्य व बँकिंगचा विकास साध्य करील. या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें केलेली सुरवात योग्य असून या धोरणाची वाढ झाली पाहिजे.

---

### हिंद सायकलींची प्रगति

१९५१ सालीं हिंद सायकल्स लि. नें १,०८,८१० सायकली तयार केल्या. मंदीमुळें सायकलींस मागणी उतरली नाहीं व कामगारांनीं चांगलें सहकार्य केलें, तर चालू वर्षी १,५०,००० सायकली तयार होऊं शकतील, असें कंपनीचे चेअरमन, श्री. आर. डी. बिर्ला, ह्यांनीं जाहीर केलें. भरमसाट आयात व मंदी ह्यांपासून सरकारनें सायकलींच्या धंद्याचें रक्षण केलें पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. गेल्या वर्षी कंपनीस २½ लक्ष रु. निव्वळ नफा झाला. १½ कोटी रुपयांच्या विक्रीवर नफ्याचें प्रमाण अगदींच कमी आहे. १९४१ सालीं कंपनीनें सायकली तयार करण्यास प्रारंभ केला, तेव्हां त्या वर्षात फक्त २,३६४ सायकली तयार झाल्या. तेव्हां मुख्य काम आयात भाग जुळवण्याचें होतें; आतां ९५% भाग कंपनीच स्वतः तयार करते. हब, मडगार्ड, फोक, पेडल, रिम, ह्या भागांचे बाबतींत आपण परावलंबी नाहीं. चेन, स्पोक आणि फ्री-व्हील ह्यांच्या उत्पादनास आतां प्रारंभ झाला आहे.

---

### अमेरिकेंत बँकांचें एकत्रीकरण

वाढता खर्च, वाढते कर आणि उतरतें उत्पन्न ह्यांमुळें अमेरिकेंत बँकांचीं एकत्रीकरण मोठ्या प्रमाणावर होऊं लागलीं आहेत. गेल्या युद्धापासून आतांपर्यंत सुमारें ४०० एकत्रीकरणें तेथें घडून आलीं आहेत. दि मॅन्युफॅक्चरर्स ट्रस्ट कंपनी आणि दि न्यूयॉर्क ट्रस्ट कंपनी ह्यांचें दि न्यूयॉर्क मॅन्युफॅक्चरर्स ट्रस्ट कंपनींत आतां रूपांतर होणार आहे. तें पुरें झालें कीं ही कंपनी अमेरिकेंतील चवथ्या अनुक्रमाची मोठी बँक होईल, आणि तिच्या ठेवी ३०० कोटी डॉलर्स भरतील. बँक ऑफ अमेरिका, नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क आणि चेस नॅशनल बँक ह्या अमेरिकेंतील पहिल्या तीन अनुक्रमाच्या बँका आहेत.

---

### इंदूर परस्पर सहकारी पेढी मर्यादित, इंदूरतर्फे श्री. आगाशे ह्यांचा सन्मान

पेढीच्या आद्य संस्थापकांपैकीं श्री. कृ. अ. आगाशे यांचा पेढीशीं ४३ वर्षांचा प्रदीर्घ व घनिष्ट संबंध लक्षांत घेऊन त्यांना नुकत्याच लागलेल्या ७१ व्या वर्षानिमित्त ता. २९ जून, १९५२ रोजीं त्यांचा सन्मान श्री. तात्यासाहेब सरवटे, सभासद, कौन्सिल ऑफ स्टेट, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आला.

## १०३ कोटी रुपयांचें छपविलेलें उत्पन्न उजेडांत आलें

### ३० कोटी रुपये प्राप्तीकर मिळण्याची अपेक्षा

छपविलेलें उत्पन्न स्वखुषीनें जाहीर करण्याची गेल्या वर्षाची मोहीम आणि प्राप्तिकर-चौकशी-मंडळाचे निष्कर्ष यांमुळें आतांपर्यंत १०३ कोटी रुपयांचें छपविलेलें उत्पन्न उजेडांत आलें आहे. या उत्पन्नांतून एकूण ३० कोटी रुपये कर मिळण्याचा अंदाज आहे.

प्राप्तीकर-चौकशी-मंडळाची १९४७ मध्यें नेमणूक केल्यानंतर त्याकडे सोपविलेल्या १५५५ प्रकरणांपैकीं ३३ कोटी रुपयांवर छपविलेल्या उत्पन्नांचा अंतर्भाव असलेल्या ७५५ प्रकरणांचा त्या मंडळानें सरकारला अहवाल सादर केला आहे. या उत्पन्नावर सुमारें ११ कोटी रुपये प्राप्तिकर यावा असा अंदाज आहे. मोठ्या प्रमाणावर कर भरणाऱ्या इसमांनीं आपलें उत्पन्न छपविण्यासाठीं योजलेल्या विविध कल्पत्या सदरहू मंडळाच्या निष्कर्षावरून सरकारच्या लक्षांत आल्या असून त्याहून कमी कर भरणाऱ्या इसमांनीं त्यांच्याच कल्पयांचा सर्रास उपयोग केल्याचें दिसून येतें. परंतु मंडळाकडे सुपूर्त करावयाच्या प्रकरणांची मर्यादित संख्या आणि मंडळाच्या नेमणुकीची ठराविक मुदत लक्षांत घेतल्यावर छपविलेलें उत्पन्न शक्य तितक्या अधिक प्रमाणांत उजेडांत आणण्याकरतां एकादा निराळा मार्ग अवलंबिला पाहिजे असें सरकारला वाटलें. गेल्या मेमध्यें सुरू केलेल्या स्वखुषीनें उत्पन्न जाहीर करण्याच्या मोहिमेचें मूळ वरील कल्पनेंतच होतें.

### मोहीमेचें यश

२२ ऑक्टोबर, १९५१ पर्यंत १४,२३२ प्रकरणें समाविष्ट असलेलें ४५ कोटी रुपयांचें उत्पन्न उजेडांत आलें. त्यानंतरहि प्राप्तीकर-कायद्यांतील नेहमीच्या तरतुदींनुसार अशीं उत्पन्नें जाहीर करण्यांत येत आहेतच. ३१ मे, १९५२ पर्यंत ५,६७० इसमांनीं जाहीर केलेल्या उत्पन्नाची रक्कम २४ कोटी रुपयांवर गेली तर त्या दिवसापर्यंत अशी एकूण रक्कम ६९ कोटी रुपयांवर असून असें उत्पन्न जाहीर केलेल्या प्रकरणांची एकूण संख्या १९,९०२ होती. दर प्रकरणांतील जाहीर केलेलें सरासरी उत्पन्न ३५,००० रुपये पडतें. ही योजना प्रामुख्यानें ज्या अल्प उत्पन्नाच्या इसमांसाठीं सुरू करण्यांत आली त्यांनीं तिचा पुरेपूर उपयोग केला. अशा उत्पन्नांपासून अंदाजें ११ कोटी रुपये कर वसूल होईल.

अशा रीतीनें स्वखुषीनें जाहीर केलेलें व प्राप्तीकर-चौकशी-मंडळामार्फत उजेडांत आलेलें एकूण उत्पन्न १०३ कोटी रुपये असून त्यापासून सुमारें ३० कोटी रुपये कर वसूल होईल. चौकशी मंडळानें तडजोड करून निकालांत काढलेल्या प्रकरणांमुळें व उपरोक्त योजनेमुळें ३१, मे १९५२ पर्यंत अनुक्रमें ४·७३ कोटी रुपये व ४·५५ कोटी रुपये वसूल झाले आहेत.

---

**पाकिस्तानांतील कापडाच्या धंद्याला संरक्षण**—पाकिस्तान सरकारच्या टॅरिफ कमिशननें देशांतील कापडाच्या धंद्याला संरक्षण देण्याची शिफारस केली आहे असें समजतें. नक्की वार्ता समजली नसली तरी धंद्याला २० ते ३० टक्के संरक्षण—जकातीचा आधार देण्यांत येईल असें म्हणतात. जपानच्या स्पर्धेमुळें अलीकडे पाकिस्तानांतील कांहीं छोट्या गिरण्या बंद पडल्या होत्या.

**मध्य-प्रदेशांत लोखंडाची माती**—मद्रास व मध्यप्रदेश राज्यांत जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआ खनिजांसाठीं शोध करीत आहे. ह्या दोन राज्यांत मिळून ९३ कोटी टन लोहमिश्रित माती सांपडेल असा अंदाज सर्व्हेनें केला आहे.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन ३२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब व. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
ॲ. मॅनेजर.



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ६ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशिवाय पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिस:—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. साळवेकर ( अध्यक्ष ) ||| श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९९,३८५ |

## एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.